## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २१/१/२०२०

**विषय क्रमांक :– २०८८ त्वर्य**

रोड सेफ्टी इम्प्रुव्हमेंट नुसार साईनेजेस रोड पार्किंग व रहदारी सुरक्षेच्या दृष्टीने तद्नुषंगिक कामे करणे (कार्यक्षेत्र भवानी पेठ विश्रामबाग क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत मुख्य रस्त्याकडे असणारे रस्ते(पथ विभागाचे) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गाजुल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४२,८५,७००/– पेक्षा १५.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६,४२,८४५/– पर्यंत काम करून घेणेस, अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,१४,२८४/– पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीतील डांबर, स्टील, सिमेंट या विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९७१ दि.१७/०१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २०८९ त्वर्य**

अब्दुल कलाम आझाद स्मारक येथे अग्निशामक यंत्रणा उभारणे व विविध विकास कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सचिन फॅब्रिकेशन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५२,०१,३३०=३७ पेक्षा १२.७५% कमी तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.४५,३८,१६०=७५ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,२४,१५९=६४ अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १४७००/– पर्यंत अधिक टेंडर अटी शर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९७२, दि.१७/०१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २०९० त्वर्य**

प्रभाग क्र.१ क कळस–धानोरी मध्ये स.नं.२१,धानोरी येथील उद्यानाची उर्वरित कामे पुर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हेरंब एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४३,८८,२२०=५६ पेक्षा १०.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,४९,३९८=५० पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रुपये ४,७३,९२७=८२ व टेस्टिंग चार्जेस र.रुपये १३,२३०/– पर्यंत रक्कम ठेकेदारास आदा करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/९७३, दि.१७/०१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २०९१ त्वर्य**

नगरसचिव कार्यालयामार्फत आयोजित करण्यात येणारे विविध समारंभ तसेच पुरस्कार वितरण समारंभप्रसंगी लागणारे स्मृतिचिन्ह मे. वेदपाठक क्रिएशन्स यांना त्या कार्यक्रमां प्रित्यर्थच्या स्मृतिचिन्हांची बिले अदा करणेस व सदर टेंडरप्रक्रीया पुर्ण होईपर्यंतच्या यापुढील काळातील कार्यक्रमांसाठी मे. वेदपाठक क्रिएशन्स यांचेकडून मागील वर्षीच्या (सन २०१८–१९) च्या टेंडरमान्य दराने स्मृतिचिन्हांची खरेदी करण्यास व त्याप्रित्यर्थ त्यांची बिले नगरसचिव कार्यालयाकडील सबंधित अर्थशिर्षकावर खर्ची टाकून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे शेड्युल 'डी' चॅप्टर ५ मधील कलम २ (२) अन्वये व कलम १ (ब) नुसार करारनामा न करता अदा करणेस पश्चात मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/नगरसचिव/९८० दि.१८/०१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २०९२ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट होणाऱ्या गावांमध्ये कचरा वाहतुक करणारी बीआरसी या प्रकारची वाहने टेंडर स्पेसिफिकेशन प्रमाणे खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आवटे फॅब्रिकेटर्स अॅण्ड ऑटोमोबाईल वर्क्स, पुणे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.३,०८,००,०००/– पेक्षा १% ने कमी) असल्याने त्यांचेकडून त्यांचे टेंडरदराने १ नग बीआरसीसाठी र.रुपये ४३,५६,०००/– जीएसटी व इ. सर्व खर्चासह याप्रमाणे ७ नग बीआरसीसाठी र.रु. ३,०४,९२,०००/– पर्यंत जीएसटी व इ.सर्व खर्चासह खरेदी करणे व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९८४ दि.२०/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– २०९३ त्वर्य**

प्रभाग क्र. ३४ अ स.नं.१४३/१४४ कोथरूड येथे नवीन बालनाटयगृह/यशवंतराव चव्हाण नाटयगृहाचे विस्तारीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सलिम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.८४,०६,६३१=०० पेक्षा अॅटपार) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८४,०६,६३१/- पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये १०,१०,९२५=१२ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ४२,४०२/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १७,७४५/- पर्यंत अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९८५ दि.२१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २०९४ त्वर्य**

मुंबई-बँगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वर पाषाण-सुस येथे उड्डाणपूल बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.वालेचा इंजिनिअरींग लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,४०,९५,२०१/- पेक्षा ४.९०% जास्त) (तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.४१,३४,०५,८६५=८४ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,९६,०८,७०३=९० पर्यंत अधिक रॉयल्टी र.रुपये ६५,७०,८९६/- पर्यंत मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ११,९३,१६१/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/९८६ दि. २१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २०९५ त्वर्य**

पुणे शहरातील विविध ठिकाणी कल्व्हर्टची दुरुस्ती विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार तिरुपती कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३,४४,३६,२३७=८५ पेक्षा ३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३,३४,०३,१५०=७१ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४०,९१,४३४=२० पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ६,७४,७५७/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १,०३,१७६/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार भाववाढ आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मु.अ.प्रकल्प/९८७ दि. २१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २०९६ त्वर्य**

सन २०१९-२० महापौर चषक अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजनासाठी मंडप व तद्नुषंगिक कामे करणे (मनपा रजि.अट शिथिल) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. शंकर बाबा एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४४,२५,२००/- पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४३,८०,९४८/- पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ५,३१,०२४/- पर्यंत अधिक अटीशर्तीतील सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९८८ दि.२१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २०९७ त्वर्य**

हडपसर मधील स.नं.४२अ/१क/३/१+२/१ड/४/१ या अॅमिनिटी स्पेसवर सांस्कृतिक हॉल (मल्टीपर्पज हॉल)बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. आनंद बिल्डींग कॉन्ट्रक्टर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १,९०,३६,४९७/- पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,८८,४६,१३२=०३ पर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये २२,८४,३७९=६४ पर्यंत अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,५५,४७४/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १,७७,२४२/- अधिक टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९८९ दि.२१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २०९८ त्वर्य**

राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यान विकसीत कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हेरंब एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८७,६९,७०६=४८ पेक्षा १.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८६,८२,००९=४२ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसारचा जी.एस.टी. र.रुपये१०,४१,८४१=१३ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये १,६३,२४७=७० व टेस्टिंग चार्जेस र.रुपये १४,४३०/- पर्यंत रक्कम ठेकेदारास आदा करणेस व त्यांचेबरोबर करार करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/९९० दि.२१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २०९९ त्वर्य**

पुणे महानगरपालिका हद्दीतील पुलांवर चेनलिंक फेन्सिंग करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राजेश एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५०,६३,०८५=०५ पेक्षा १५.०४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४३,०१,५९७=०६ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,०७,५७०=२१ पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये १६,५४९/- पर्यंत अदा करणेस अधिक टेंडर अटी शर्तीनुसार विशेष भाववाढ सूत्रानुसार फरक अदा/कपात करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मु.अ.प्रकल्प/९९१ दि. २१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २१०० त्वर्य**

प्रभाग क्र.३९ क मधील दुर्वांकुर गार्डन परिसरात स्पोर्टस कॉम्पलेक्स विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. ध्रुवतारा एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३३,८९,६१७/- पेक्षा १०.०२७% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३०,४९,७४०=१० उपलब्ध तरतुदी रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक जी.एस.टी. र.रुपये ४,०६,७५४=०४ अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये ७०,६७०/- अधिक मटेरियल टेस्टिंग र.रुपये २४,४६५/- पर्यंत अधिक निविदा अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील या विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/९९३ दि.२१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २१०१ त्वर्य**

प्रभाग क्र. १२ क मध्ये बाळासाहेब ठाकरे उदयान येथे डायनासॉर पार्क तयार करणे कामी सॉफट सिलीकॉन मेटल स्ट्रक्चर असलेले डायनासॉर पुरविणे, बसविणे व चालु करुन देणे व एकूण १० वर्ष कालावधी करिता नि:शुल्क मेटेरियलसह दुरुस्ती करुन प्रकल्प सुस्थितीत ठेवणे, या १० वर्ष कालावधीपैकी पहिले ५ वर्ष दैनंदिन देखभालीसह ऑपरेटर नि:शुल्क पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.गार्डीयन मिडीया अॅन्ड एन्टरटेन्टमेंट प्रा.लि. पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पुर्वगणनपत्रक र.रु.१,२४,९५,५७३/- पेक्षा २% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,२२,४५,६६१=५४ अधिक जी.एस.टी. १८% र.रुपये २२,०४,२१९=०८ असे एकूण र.रुपये १,४४,४९,८८१/- जी.एस.टी. सह उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करुन घेणेस व त्यांच्याशी करारनामा करणेस आणि त्यांनी केलेल्या कामापोटी बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/९९४ दि.२१/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २१०२ त्वर्य**

मा.सुनिल कांबळे, आमदार यांचे दि. १७/१/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र. २०१८ दि. १४/१/२०२० (पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता मे.डेस्क कन्सल्टंट यांचे मा.स्थायी समितीने यापुर्वी मान्य केलेल्या संदर्भ क्र. १ च्या ठरावामध्ये बदल करुन मे.डेस्क कन्सल्टंट यांचे प्रोजेक्ट र.रुपये ५.०० ते २०.०० कोटीपर्यंतचे वर्ग (II) मध्ये नाव समाविष्ट करणेस मान्यता देण्याबाबत) चा फेरविचार करण्यात यावा.

**विषय क्रमांक :- २१०३ त्वर्य**

पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागकडील सन २०१९-२० चे 'क' अंदाजपत्रकातील भांडवली कामातील शिल्लक रकमेतुन - मलनि:स्सारण भांडवली कामे करणेकरिता रक्कम रूपये १२००.०० लक्ष सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/९८१ दि.१८/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २१०४ त्वर्य**

पाणीपुरवठा व मलनि:सारण विभागकडील सन २०१९-२० चे 'क' अंदाजपत्रकातील महसुली कामातील शिल्लक रकमेतुन - पाणीपुरवठा विभागाकडील महसुली व भांडवली कामाच्या करावयाच्या अत्यावश्यक कामांसाठी रक्कम रूपये २४८५.०० लक्ष सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/९८२ दि.१८/१/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २१०५ त्वर्य**

आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय योजनेअंतर्गत परवानाधारक औषधे विक्रेत्याकडून दैनंदिन स्वरूपात औषधे व इतर साहित्य खरेदी करणेकामी रक्कम रूपये १,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक कोटी फक्त ) वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९२ दि.२१/1/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२०२० चे अंदाजपत्रक, आरोग्य खाते, शिवाजीनगर विधानसभा मतदार संघातील दळवी हॉस्पिटल मध्ये विविध सुधारणा करणे, CE17A242/SJ6-383 | १,००,००,०००/- | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>आरोग्य कार्यालय, ७ क रुग्णालये , प्रसुतीगृह औषधालये, आर्थिक दुर्बल गटांसाठी आरोग्य सहाय्य योजने अंतर्गत औषधे खरेदी RE17F141 | ---- | १,००,००,०००/- |

**विषय क्रमांक :- २१०६ त्वर्य**

सर्व क्षेत्रिय कार्यालयाकडील झाड्ण हद्दीतील कामे आउट सोर्सिंगने करणेसाठी खालीलप्रमाणे र.रुपये३३,४६,००,०००/- वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/९९७ दि.२१/1/२०२० चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, वाहतुक व नियंत्रण विभाग, CE20B102/T2-21, Electronic बस GCC मोडेल /विकत / PPP ई धर्तीवर बस उपलब्ध करुन देणे | ३३,४६,००,०००/- | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| ९ पथांची झाडलोट, कचरा वाहतुक व मैलापाणी व्यवस्थापन - क-२ पथांची झाडलोट (विभागीय कार्यालय) आऊटसोर्सिंगने कचरा संदर्भांत कामे करून घेणे. (RE 19A ###D) | | |
| १) औंध बाणेर RE 19A 212 D | --- | ३,८५,३०,९८६/- |
| २) कोथरूड बावधन RE 19A 204 D | --- | १,०७,८५,४२१/- |
| ३) घोलेरोड शिवाजीनगर RE 19A 203 D | --- | ७५,००,०००/- |
| ४) वारजे कर्वेनगर RE 19A 213 D | --- | ७,७६,७२,९१२/- |
| ५) ढोलेपाटील RE 19A 210 D | --- | १,४०,००,०००/- |
| ६) नगररोड RE 19A 211 D | --- | ३,२०,००,०००/- |
| ७) येरवडा कळस धानोरी RE 19A 214 D | --- | २,८९,७०,०२७/- |
| ८) भवानीपेठ RE 19A 208 D | --- | ० |
| ९) कसबा विश्रामबाग वाडा RE 19A 202 D | --- | १२,७७,१४९/- |
| १०) सिहगंड रोड RE 19A 205 D | --- | १,७९,७५,७६४/- |
| ११) कोढंवा येवलेवाडी RE 19A 206 D | --- | ३,०७,४०,७३८/- |
| १२) हडपसर मुंढवा RE 19A 209 D | --- | ४३,००,०००/- |
| १३) बिबवेवाडी RE 19A 207 D | --- | २,१८,८८,५८१/- |
| १४) धनकवडी /सहकारनगर RE 19A 215 D | --- | २,५०,००,०००/- |
| १५) वानवडी हडपसर RE 19A 216 D | --- | २,३९,११,९९८/- |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- २१०७ त्वर्य**

मा.सौ.कविता वैरागे यांचे दि. २०/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.२८ अ मध्ये खालील विविध ठिकाणी विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये ५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १२. भवने, भुमि व मनपा वसाहतीची व्यवस्था, पान क्र.१०२, अ.क्र. ३६, शहरामध्ये समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका व्यायाम शाळा, विरंगुळा केंद्रे, ध्यानकेंद्रे महिला बचत गट हॉल, आधारकेंद्रे बांधणे (यादी क्र. एसजे-२०), पान क्र.२४९, अ.क्र.२१७, प्रभाग क्र. २८ अ मध्ये नाना नानी पार्क मधील ओपन स्पेस मध्ये विरंगुळा केंद्र बांधणे | ५० लाख | - |
| **नविन सुचविलेली कामे-** | | |
| १.प्रभाग क्र. २८ अ मध्ये डायस प्लॉट व ढोले मळा परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | - | २० लाख |
| २. प्रभाग क्र. २८ अ मध्ये खड्डा परिसर,ढोले मळा, डायस प्लॉट या परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | - | २० लाख |
| ३. प्रभाग क्र. २८ अ मध्ये विविध ठिकाणी वाचनालय बांधणे व इतर तद्नुषंगिक कामे करणे. | - | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- २१०८ त्वर्य**

मा.सुनिल टिंगरे, आमदार व मा.विशाल तांबे यांचे दि. २०/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.२ फुलेनगर-नागपूरचाळ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रुपये२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, १२. भवने, भुमि व मनपा वसाहतीची व्यवस्था, पान क्र.१०२, अ.क्र. ३६, शहरामध्ये समाजमंदिर, ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका व्यायाम शाळा, विरंगुळा केंद्रे, ध्यानकेंद्रे महिला बचत गट हॉल, आधारकेंद्रे बांधणे (यादी क्र. एसजे-२०), पान क्र.२४५अ.क्र.२१, प्रभाग क्र. २ ड स.नं. ३६ येथे व्यायाम शाळा बांधणे. | २५ लाख | - |
| | नविन सुचविलेली कामे- | | |
| १. | प्रभाग क्र. २ फुलेनगर-नागपूरचाळ मधील महाराष्ट्र हौसिंग बोर्ड या भागात दिशादर्शक बोर्ड बसविणे. | - | १० लाख |
| २. | प्रभाग क्र.२ फुलेनगर-नागपूरचाळ मधील कस्तुरबा हौसिंग सोसायटी याठिकाणी दिशादर्शक बोर्ड बसविणे. | - | १० लाख |
| ३. | प्रभाग क्र.२ फुलेनगर-नागपूरचाळा मधील नागपूरचाळ व विविध ठिकाणी दिशादर्शक बोर्ड बसविणे. | - | ५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- २१०९ त्वर्य**

मा.उमेश गायकवाड व मा.प्रकाश ढोरे यांचे दि. २१/१/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.९ क मध्ये बाणेर,बालेवाडी,पाषाण भागात विविध ठिकाणी टॅंकरने पाणी-पुरवठा करणेसाठी र.रुपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१९-२० चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, २.मलनि:सारण विभाग, पान क्र.२६, अ.क्र. ४, शहरामध्ये मैलापाणी शुध्दीकरण केंद्र बांधणे आणि विद्युत विषयक, स्थापत्य विषयक यांत्रिकी विषयक कामे करणे, (यादी क्र. एसडी-५), पान क्र.६७, अ.क्र.१, प्रभाग क्र. ९ क पाषाण तलाव नजीक एस.टी.पी. प्लांट उभारणे. | २० लाख | - |
| **नविन सुचविलेले काम-** | | |

| | | |
|---|---|---|
| प्रभाग क्र.९ क मध्ये बाणेर,बालेवाडी,पाषाण भागात विविध ठिकाणी टँकरने पाणी – पुरवठा करणे. | – | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– २११० त्वर्य**

क्रीडा विभागाच्या अखत्यारीतील पुणे पेठ सदाशिव स.नं. १५ प्लॉट नं.४० व कै.बाबुराव सणस स्पोर्टस ग्राउंड येथील बॅडमिंन्टन हॉल मधील २ कोर्ट लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर विहीत अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता चालविणेस देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/क्रीडा/८६९,दि. १९/१२/२०१९ चे पत्रावर झालेला शहरसुधारणा समिती ठराव क्र. २५२ दि.१०/१/२०२० विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**